**<u>गोपनीय</u>**

**क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१३३**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १० एप्रिल, २०१४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ मार्च, २०१४ (गुरुवार) रोजी झालेल्या १३३व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**<u>प्रत अग्रेषित :-</u>**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३३व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२७ मार्च, २०१४ (गुरुवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी १०.०० वाजता** |
| **सभास्थान** | **:** | **सहयाद्री राज्य अतिथीगृह,<br>बी.जी.खेर मार्ग,<br>मलबार हिल,<br>मुंबई - ४०० ००६.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.पृथ्वीराज चव्हाण<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. नवाब मलिक<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. यशोधर फणसे<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिलीप पटेल<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. ज. स. सहारिया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |

..२/-

श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास — सदस्य
अति. महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी)

श्री. यु.पी.एस. मदान — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**निमंत्रित :**

श्री. नारायण मानकर
महापौर,
वसई-विरार शहर महानगरपालिका

श्रीमती कविता गायकवाड
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्री. सुनील चौधरी
नगराध्यक्ष,
अंबरनाथ नगरपरिषद

श्रीमती चारुशीला घरत
नगराध्यक्षा,
पनवेल नगरपरिषद

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अतिरिक्त कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी श्री. उदय सामंत, नगर विकास राज्यमंत्री यांचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून व श्री. यशोधर पद्माकर फणसे, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री. ज्ञानराज यशवंत निकम, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका, व श्री. दिलीप घनःश्याम पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्राधिकरणाचे नवे नामनिर्देशित सदस्य म्हणून स्वागत व अभिनंदन केले. तसेच शासनाचे मुख्य सचिव श्री. ज. स. सहारिया यांचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. नारायण मानकर, महापौर, वसई-विरार शहर महानगरपालिका, श्री. हरिश्चंद्र पाटील, महापौर, ठाणे महानगरपालिका, श्रीमती कल्याणी पाटील, महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, श्री. सुनील चौधरी, नगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपरिषद, श्रीमती चारुशिला घरत, नगराध्यक्षा, पनवेल नगरपरिषद, श्रीमती स्नेहा पातकर, नगराध्यक्षा, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद व श्री. अनिल डिग्गीकर, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच, माजी नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव व शासनाचे माजी मुख्य सचिव श्री. जयन्त कुमार बाँठीया यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

तसेच श्रीमती प्रतिभा पाटील, महापौर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका, श्रीमती कॅटलीन परेरा, महापौर, मीरा-भाईंदर महानगरपालिका, श्रीमती आशा ईदनानी, महापौर, उल्हासनगर महानगरपालिका, श्री. नितीन पाटील, नगराध्यक्ष, उरण नगरपरिषद, श्रीमती नमिता नाईक, नगराध्यक्षा, अलिबाग नगरपरिषद, श्री. अजय सावंत, नगराध्यक्ष, माथेरान नगरपरिषद आणि श्री. बिपीन श्रीमाळी, माजी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्राधिकरणाचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेतील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील १३२व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या एप्रिल, २०१४ ते जून, २०१४ या तीन महिन्यांच्या अंतरिम अर्थसंकल्पास मंजूरी.</u>**

२.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचा एप्रिल, २०१४ ते जून, २०१४ या तीन महिन्याचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. या संदर्भात असे नमूद केले की, लोकसभेची २०१४ची निवडणूक जाहीर झाल्यामुळे २०१४-१५ या संपूर्ण वर्षाकरिता अर्थसंकल्प सादर करणे शक्य नाही. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबवित असलेल्या प्रगतीपथावरील कामे आणि प्रशासकीय बाबींवर दिनांक ०१.०४.२०१४ ते दिनांक ३०.०६.२०१४ या कालावधीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कालावधीसाठी अंतरिम अर्थसंकल्प (Interim Budget) सादर करण्यात येत आहे. या

विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाला जमिन विक्री पासून रु. ३०७ कोटी, ठेवीवरील व कर्जावरील व्याज आणि इतर जमा रक्कमेपासून रु. ४३९ कोटी केंद्र शासनाकडून एम.यु.टी.पी. करीता केंद्रीय अर्थसहाय्य रु. ७५ कोटी व मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट कडून सहार उन्नत मार्गासाठी अंशदान रु. ४१ कोटी, अशा प्रकारे एकूण रु. ८६२ कोटीची जमा अपेक्षित आहे. प्राधिकरणाचा प्रशासकीय खर्च रु. २४.१० कोटी, भांडवली खर्च रु. १३.२० कोटी, स्थानिक संस्थांना पायाभूत सुविधेसाठी कर्ज रु १२५.२० कोटी, सर्वेक्षण, अभ्यास, अनुदाने करिता रु.७.२० कोटी व विविध पायाभूत योजनांवरील खर्च रु. ७२४.७० कोटी असा एकूण खर्च रु.८९४.४० कोटी असून एकूण रु ३२.४० कोटींची तूट दिसून येत आहे. सदरहू तूट प्राधिकरणाकडे असलेल्या ठेवीमधून भागविण्यात येईल. सदर अंतरिम अर्थसंकल्पामध्ये नवीन विकास कामांकरिता तरतूद करण्यात आलेली नाही.

२.२ प्राधिकरणाचे सदस्य श्री. यशोधर फणसे, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकरणाव्दारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ते आणि उड्डाणपूलांच्या बांधकामाच्या ज्या योजना राबविण्यात येतात त्याबाबतची तपशिलवार यादी उपलब्ध करुन दयावी त्यामध्ये जे रस्ते किंवा उड्डाणपूलांची कामे प्राधिकरणाने हाती घेतलेली नाहीत त्या परिसराच्या विकासाकरिता आवश्यक आहे अशी कामे महानगरपालिकेतर्फे राबविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करता येईल. तसेच प्राधिकरणाने जी कामे हाती घेतलेली आहेत त्याची सुध्दा यादी उपलब्ध करुन दयावी. या संदर्भात मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी चालू असलेल्या कामांची यादी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना महानगर आयुक्त यांना दिल्या.

२.३ मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणा-या सर्व कामांची यादी नव नियुक्त सदस्यांना देण्यात यावी.

२.४ प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, ओशिवरा जिल्हा केंद्र या परिसरात पुनर्वसनासाठी ज्या इमारती बांधल्या आहेत त्या इमारतींमध्ये नागरी सुविधांचा अभाव आहे. तसेच त्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची गरज आहे. सदर पुनर्वसनाच्या इमारती ७ मजली असताना त्यामध्ये उद्‌वाहन व्यवस्था चांगल्या प्रकारची नाही, इमारतींमध्ये गळतीच्या समस्या आहेत. रस्त्यावर प्रकाश व्यवस्था नाही. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर पुनर्वसनाच्या इमारतींची पाहणी केलेली असून आवश्यक ते दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. यासंदर्भात मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी महानगर आयुक्त यांना सदर इमारतीतील आवश्यक दुरुस्त्या करण्याच्या सूचना दिल्या.

..५/-

२.५ प्राधिकरणाचे सदस्य श्री. नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी एस.आर.ए. स्कीमच्या समस्यांबाबत असे सांगितले की, एस.आर.ए. ने बांधलेल्या इमारतींमध्ये काही अभाव दिसून येतो. त्यावर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी लगेच दुरुस्ती करण्याच्या संबंधितांना सूचना दिल्या.

२.६ प्राधिकरणाचे सदस्य, श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर व मेट्रो चालू झाल्यानंतर मेट्रोच्या खालच्या रस्त्यांचे काम कोण करणार असा प्रश्न उपस्थित केला होता त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मेट्रो मार्ग अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावर असून मेट्रोचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. मेट्रोच्या खाली असलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तींचे काम प्रगतीपथावर आहे. रस्ता दुरुस्त केल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येईल.

२.७ त्यानंतर, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी महानगर आयुक्तांना असे सांगितले की, प्राधिकरणाची आगामी बैठक लवकरच आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये आवश्यक त्या बाब टिप्पण्या सादर कराव्यात.

२.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३०३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधींचा (महानगर योजना आणि मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी सह) दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते ३० जून, २०१४ या कालावधीकरीता अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा अंतरिम अर्थसंकल्प मंजूर करण्यात येत आहे."

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

---------XOX---------